# चित्राक्षरी

## २

काव्यचित्रे









अरूण काकतकर

अल्पाक्षरी.

ई साहित्य प्रतिष्ठान

प्रकाशक

www.esahity.in

www.esahity.com










छायाचित्रे व चित्रे

आसावरी काकडे ,

मिलिंद सबनिस

राम केळकर

डॉ. श्रीकांत केळकर,

डॉ. कौमुदी गोडबोले,

डॉ. पौर्णिमा करंदीकर,








अल्पाक्षरी :


अरुण काकतकर


१२/०८, लक्ष्मीनारायण नगर, पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे ४११००४


भ्रमणध्वनि: ९१५८८८९४८८
९८२२०२१५२१

E mail: 24ak47@gmail .com


निष्कलंक
निळी चादर
पसरली
आभाळभर
उशीमध्ये
मेघांची सावर
उत्सव क्लान्ता
विश्रामहेतु


हलाहल घुसळिता अमृत
तैसे ऊर्ध्वगामी होतं
चक्रवातोद्भव नवनीत
दावे 'रवी'
त्यांत मुद्रा एक दिसे
मार्जारयोनिशी साम्य असे
वानरां तोलून की देतसे
लबाड मावशी ?


मागे जलद भुरा फिकट
पुढे तीन तंतांची भेट
जेथे छेद तेथे गाठ
भासे , स्तर भिन्न जरी
विश्व सारे त्रिमितींतले
एका पटावर रेखीले
तर दृष्टीभ्रम असले
अनिवार्य


किती वाचावे चेहेरे
किती विक्राळ आकार
गर्भी आहे दडलेली
सौदामीनी भयंकर
दूर गाज गडगड
मग तडितेचा कडाड
ऊजळेल कणकण
जळ आभाळ पहाड
झड सुखाच्या सरींची
जीवा मात्रा अमृताची
शालू हिरवा नेसूंवा नि
चोळी चिंबेल धरेची

# डोळे आणि मन प्रसन्न करणारी चित्रावली

****

अतिशय सुंदर निर्मळ आकाश, पावसाळ्यातले दोन-तीन महिने मेघांच्या अनेक रंगरुपानी ओथंबलेलं, थेंब थेंब पावसानं बसणारं, विश्वाला चराचराला रानावना सोबतच अवघ्या मानवजातीला नवचैतन्य देणारं, जगण्यासाठी आनंद देणाऱ्या वृक्षवल्ली, अनेक रंगरूपाची झाडं,वनश्री फळझाडं, फुलं आणि प्रत्येक ऋतूमध्ये हजारो पंखांचं सौंदर्य घेऊन येणारे पक्षी त्यांचं सौंदर्य व चिवचिव गाणी पक्षांची बोली, हे दुःख वेचणार आणि आनंद अधिकाधिक पेरून तजेलदार करणार आहे ! सुंदरतेच्या सुमनावरले दवं चुंबुन घ्यावे,

चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे

असं बालकवींनी सांगितलंच आहे आणि ते पूर्ण सत्य आहे, चिरंतन साक्षात्कारी आहे ! निसर्ग झाडी वनश्री रानातली सदाबहार पीक आणि एकएकटे किंवा थव्याथव्यांनी गिरकी घेऊन आपले मैत्र जडलेले पक्षी, डोंगर वाहते झरे, त्यातले हलके हेलकावे, लाटा, त्यात आंघोळ करणारे पक्षी पिवळ्या लाल चोचींचे, हे सगळं, त्यांतलं सौंदर्य, आपले डोळे व मन सुंदर करणारं असं आहे ! प्रत्येक ठिकाणी पोहोचता येत नाही अशा वेळी त्याचं चित्ररूप आपल्याला पाहता येत. आपण ते चित्र लावण्य पाहून नवे टवटवीत होतो.

अत्यंत कलात्मक दृष्टीनं, डोळ्यांमध्ये त्याची साठवण करून कॅमेऱ्यामध्ये छान टिपण्याचे काम कवयित्री असावरी काकडे यांनी केलेलं आहे.

जगातल्या हजारो-लाखो घराच्या भिंतींना या रूपगंध घेऊन आलेल्या चित्रांनी सौंदर्य देऊन आनंददायी केलेलं आहे. कवयित्रीचं कलासक्त मन आणि डोळे यांनी हे छान टिपलेले आहे. हे प्रत्यक्षात पाहणे फार मजेच आहे. या पक्ष्यांचं, वनश्रीचं, पिकांचं लावण्य पाहण्यासाठी मी खूप खूप हिंडलो आहे.

त्याच ठिकाणी वेगळ्या तंत्रज्ञानाचे व रसिकांशी जडलेल्या प्रेमळ नात्यांमुळे माझे मित्र श्री अरुण काकतकर यांच्या कविता मी खूप वाचल्या, अनेकदा भेटलो !

आसावरी ताई काकडे त्यांना सवंगडी झालेले मिलिंद सबनीस श्री. राम केळकर यांच्या या अभिनव चित्राक्षरी साठी खूप खूप धन्यवाद आणि त्यांचे मनापासून स्वागत.

- ना.धों.महानोर.


गुलाबी चोचीमागं,
मुद्रा लालेलाल,
कुणावर एवढा
संताप बाबा,
फुगवुन बसलायस
गाल ?
निमुळती मोहक
शेपटी, पोपटी
फांदीशी
तिची स्पर्धा
नको जाऊं करून
आमचा जीव
अर्धाअर्धा

# मुक्त




आता कसं छान वाटतय
आभाळमायेनं घातलय न्हाऊ
माणकांची बिंदी मिरवत
सांगा आता मी कुठं जाऊं ?
निथळून सारा गेला जळभार
तरी अंगचटीला रेंगाळलेत चार
वारा धसमुसळा जर आला
मातींत पडून

गंधित

संगीत


कोंदण तेच हिरवं कंच
जडली रत्नं विविधपरी
इंद्रचापे न्हाऊं घातल्या
आभाळाचा साज धरती उरी


यौवना शुभ्रावृता सुस्नांत
काळीज तिचं उडतंय
उरांत ?
षड्‌भुजा, पसे पसरून
पसाय मागतेय
मनापासून
कुठून तरी झुळुक येईल
ओंजळींत बीज रुजवून
जाईल


फुलावेरी पोहचाय आधींच
पांखरू श्रांत, क्लान्त
हिरव्याकंच पानावळींत
विसावलंय दोन क्षण निवान्त
नाजुक साजिऱ्या पंखांवर रेखलिये
भूतांनी सुबक नक्षी
वनराणी, तरुवर, तृणपाती सारे
प्रवासाचे साक्षी


जरावृत्त चादी रुजली
तरी ओलांडू पाहातोय
सीमा
अजून वाटंत नाही याला,
कीं
'परतांवं आतां निजधामा'


Red Breasted Flycatcher
इवलास्सा देह पण
वट्टारलेंत कां डोळे ?
घाबरलेली खारोटी
इकडून तिकडं पळे
वेधक इतकं रंगरूप
कीं व्यापून टाकतोय दिठी
भाग आभाळाचा हो बाबा ।
नको थांबू कुणासाठी

## ’ई’श्वर भक्तांची मांदियाळी – १

सुरेशचंद्र पाध्ये, माजी संपादक, दैनिक सकाळ

अरूण काकतकर, आसावरी काकडे, मिलिंद सबनीस आणि राम केळकर या चौकडीचं एक देखणं इ-कलापत्य म्हणजे चित्राक्षरी.


काकतकर यांचं आणि माझं नातं मित्रत्वाचं. ते त्यांची अल्पाक्षरी रोज सकाळी माझ्या सकाळीचं सोनं करायला पाठवतात. त्यातला कविता करणाऱ्या विदुषी आसावरी काकडे यांचा सहभाग त्या अल्पाक्षरीला कारणीभूत असलेल्या प्रकाशचित्रांचा - आसावरी काकडे यांच्या **कवीमनानं टिपलेल्या** प्रकाशचित्रांतूनही काव्य झिरपत असतं. मात्र त्यांना अल्पाक्षरी चित्रकथीचं रुपडं ल्यायला भाग पाडलं ते अरूण काकतकरांनी. या जोडगोळीच्या **सुप्रभात** उपक्रमात यथावकाश मिलिंद सबनीस आणि राम केळकरही सहभागी झाले. मिलिंद जयंत सबनीस हे सेवानिवृत्तीनंतर किंवा व्यवसायनिवृत्तीनंतर पुण्यात स्थायिक झालेले गृहस्थ. पुण्यात सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते. अशाच एका कार्यक्रमात पक्षीनिरीक्षणासंदर्भातील व्याख्यानानं प्रेरित होऊन त्यांनी पक्ष्यांची प्रकाशचित्रं काढायला सुरूवात केली आणि गेली पाच-सात वर्षे त्यांनी **पक्षी-निरीक्षण** प्रकाशचित्रणाचा छंद जोपासला आहे. त्यांनी प्रकाशचित्रण यंत्राच्या (कॅमेऱ्याच्या) भिंगातून चौकटबद्ध केलेली प्रकाशचित्रंही त्यांच्या सुप्रभातप्रेमी भ्रमणध्वनीसंचधारी गटाच्या माध्यमातून वा अन्य रीतीनं काकतकरांकडं पाठवायला सुरूवात केली आणि मग तीही काकतकरांच्या अल्पाक्षरीची चव चाखू लागली. या उपक्रमात यथावकाश शिवराम विनायक तथा राम केळकर हे मरीन इंजिनियरचा चरितार्थाचा उपक्रम संपवून संगणकावर पेंट शॉपचा वापर करून चित्रकारिता जोपासणारे उत्तम दर्जाचे **छांदिष्ट मोबाईल पेंटर** सहभागी झाले कधी हे त्यांनाही समजले नाही; पण माणसं आणि त्यातही कलावंत माणसं जमवण्याचा छंद असणाऱ्या काकतकरांनी स्वतःसह या सगळयांचा गोफ गुंफून अल्पाक्षरीसह प्रकाशचित्रांची ही चित्राक्षरी आकाराला आणली आहे आणि ई साहित्य प्रतिष्ठान या **नव्या युगाच्या ई विश्वातील** संस्थेनं ती इ प्रकाशित करण्याचा घाट घातला आहे.


Greater Flemingo
झेप घेउनि जाईन
दूर देशी
ना तसाही अडकेन
कुण्या पाशी
बळ लंचण्या पंखांत
लधि सात
भरुनि घेतलि मी
जिगीषा उरांत
कर्मयोग्या भटकणे प्राक्तनांत
ना कुणीही आळश्यास कवळ देतं


Eurasian Coot
झेपाबायला उंच
पंखांत बळाची आबाळ
जाणून सारी व्यथा,
खाली उतरलय आभाळ
जळाईला भेटाया पाहा
निळाई आली
पांखराच्या मनांतली
खंत उडून गेली
कुठं पडतंय कमी, वाटतं
तर कुठं उतूं जातं
जिण्याच्या राहाटाचं गाडगं
अखंड खाली-वर फिरतं


काय येवढं
आक्रित घडलय
कीं पहातूयास
वाकून इतकं ?
फांदीवरची
सुटंल पकड नी
पसरावे लागतील
पंख
आणखी
कांही काळ
Golden Oriol
नंतर झेप
घेशीलंच !
तुझंच आहे
आभाळ

रे सजणा



शाखा शिखांच्या
मधून अंबर
दिसे
अर्धदीप्त
लखलखते आहे
झुंबर जणु,
की
शशिधर पूर्णोन्मलित




Red Whiskered Bulbul
चोंच इवली इवली
किंचित उघडलेली
दिठींत दिसतेय भीती
नी करुण भाव
कां रे पांखरा
हिरमुसलायस असा
दूर राह्यलाय कां गांव ?
आभाळमाया
असीम अनादि
रोजच तुझ्या
सांगाती
झेप घेऊन वारायला संकटं
उघड पंखांची पाती




Grey Wagtail
गरीब बिचारा,
टिपतोस दाणे
यासाठीचतर
ढकलायचे जिणे
घास चार
ढकलायचे पोटात
वारं परत भरायचं
झेपावतांना उरात
तेच तेच
रोज !
तरी उरकायचं
जीवाचं रान
सतत करत
राह्यचं
मिळतील तेवढी भोगायची सुखं
जन्मजात सोबत असतंच दुःख





Stork Billed Kingfisher
उलटां करून कंठापर्यंत
बुडवा याला पाण्यांत
थोडी करून शाई निळी
उरलं वापरा धुण्यांत
लेखणीनं लिहा कांही
मन मोकळं करा
नीळी झाकवाला सदरा
खुलेल अजून जरा

’ई’श्वर भक्तांची मांदियाळी- २


**सुरेशचंद्र पाध्ये, माजी संपादक, दैनिक सकाळ**

कोणे एके काळी नाटक शिक्षक, पत्रकार म्हणून आणि नंतर सकाळच्या पुणे आवृत्तीचा संपादक म्हणून माझं नाव वाचकांना परिचित होते. माझी आणि काकतकरांची ओळख अशाच काहीशा नात्यांतून प्रथम झाली असावी, पण मैत्री झाली ती ते **दूरदर्शनचे निर्माते तसंच बालचित्रवाणीचे संचालक** असताना. माझी कन्या हिमानी हिला त्यांनी बालकलाकार म्हणून हेरलं होतं आणि बालचित्रवाणीच्या कार्यक्रमात ते तिला कलाकार म्हणून सहभागी करून घेत. मी तिला बालचित्रवाणीच्या कार्यक्रमात पोचवायला, आणायला आणि कधीकधी तिच्या कार्यक्रमांच्या चित्रीकरणालाही उपस्थित राहण्यासही जात असे. तेथेच आमचे सूर जुळले. व्यावसायिक पातळीवर परस्परांच्या पदांचा उपयोग स्वतःसाठी न करून घेण्याचा गुण आम्ही उभयपक्षी जपला होता. त्यातूनच आमचं मैत्र जुळलं असावं. त्यामुळेच आता निवृत्तावस्थेत असताना मित्रकर्तव्य म्हणून हे लेखन अनावर मनानं केलं आहे.

काकतकर हा अतिशय **हरहुन्नरी कलावंत** मनाचा माणूस आहे. दूरदर्शनवरचा त्याचा निर्माता या नात्यानं त्यानं गाजवलेला कालखंड आजही दूरदर्शन-प्रेक्षकांच्या स्मरणातून गेलेला नाही. अरूणनं स्वतः बालपणापासूनच कलाप्रेम जोपासलं. शास्त्रीय गायनाचंही रीतसर शिक्षण त्यानं घेतलं आहे. तो जेवढा गायक-कलाकार आहे त्यापेक्षाही तो **उत्तम कानसेन** कलाकार आहे. त्यामुळंच त्यानं संगीत क्षेत्रातल्या उत्तमोत्तम व्यक्तींना दूरदर्शनच्याच माध्यमातून नव्हे तर जमेल त्या प्रत्येक रीतीनं लोकांसमोर आणण्याचं व्रत आयुष्यभर पाळलं आहे. त्याचबरोबर इतर कलांकडेही त्याचं रसिक मन जसजसं झेपावत गेलं तसतशी इतर **कलांतील श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वं** आपलीशी करण्याचं आणि त्यांच्या कलेचा आस्वाद रसिकांपर्यंत पोचवण्याचं कार्यही त्यानं केलं आहे.


बरोबरची बरोबर
बांधून खूणगांठ
पाखरांचा माळ
कापतेय आभाळवाट
कुठं कुणी वळण यांना
कसं असेल लावलं ?
दृष्ट यांची काढाया कुणी
कां बरं नाही धावलं ?
शिकलीसवरली तरी
बेमुर्वत राह्यली मानसं
झडलीपडली उद्या तरी
भूतांना वाटलं हायसं

# जरा अस्मान झुकलं


होळीची अजून नाही हाळी
तरी कोन उधळतया तांबडं ?
निळाईचं रंगलय नेसूं
कवन्या काठ-पदराचं लुगडं
आभाळांत हुडहुडता गुलाल
कुडकुडंत वाकळींत जबरीनं घुसल
दोन अधीर धसमुसळ्या जीवांच्या
द्वाड, मंदीच जाउन बसल


अवकाशी पक्षी
लोभस झेपावला ?
वरुणास्त्रधारि
कळिकाळ
किं
अवतरला ?
कीं नावेला
लाट उंच
उडविते ?
पाहूं गेल्यां
जे सुचेल ते
समजते
काचांचे तुकडे घेउनि दर्पण सांधू
बिंबांत भंगल्या ध्वस्त मनाला शोधूं


आभाळातळी घुमति
सावळ्या कथा
परि तमारि
सहजी वारि
रानांच्या
कृष्णकथा
जळीस्थळी भूतांच्या
वरदायी
प्रथा
शाखांवरी फुटव्यांच्या
लक्षवेधी
गाथा
लख्ख उजळले मंडल
पर्णगात्री चैतन्य
झुळक गार वाऱ्याचिहि
ऊब पिऊनी धन्य

# मनरंग


सुवर्णवर्ख सृष्टीवरी
वितरतो आहे तमारि
चैतन्यभोगाची तयारी
प्राणिमात्रा..
ऐशा नवोन्मेषि कळा
सुशोभिती जळा-स्थळा
दिठीसि सुखभोग आगळा
प्राणिमात्रां..


Spot Breasted Fantail
बरं दिसतं कां ?
सांगा बरं !
असं उगा पिसं
फिस्कारणं
एवढं मनाला जडलंय
कसलं पिसं !
कोण्या कारणं
डोळ्यांतली
पाहा आग..
कसला एवढा
राग ?
निसटून गेलय
पंजातून याच्या !
काढंत असता
माग..

नाविन्य


अदम्य


आसक्त मन..
आणते खुडोनं..
पात्रांत ठेऊनं..
म्हणे 'माझे'..
नक्षीदार जरी..
सर्वांगभरी..
पोरक्यां कांटेरी..
तरी भासे..
उमलेल्या कळींस..
करींत प्रयास..
शोधाया सायास..
वल्लरीचे.. ?
मातीच्या बंधासी..
मुळांच्या गुंत्यासी..
तरुपरिवारांसी..
त्यजूं नये
सारेंचं नश्वर..
धुळींसं मिळणारं..
नियमानुसार..
अनिवार्य..
म्हणोनी स्वगृही..
सुखाच्या प्रवाही..
आप्तांचींची बाही..
आधाराहं



धगधगतोय चुलींत वेन्ही
शमवायला जठराग्नी
बाराचं कोडं
कुणाला कां चुकतं
तत्वज्ञान सगळं
भाकरीशी येऊन थांबतं


अधुरपर्णि
शाखेवर
पंखमिटुनि
निश्चल स्थिर
अवकाश अनंत
असीम अपार
लंधेल सहजि
पसरुनि पर


ए बाबा ! कुठं
कशी
शोधायची चोच ?
मान वर केली,
तरी
दिठीची नाही
पोच..
जळापासून
आभाळापर्यंत
सरळसोट
आकार
शुभ्रचा अंगभर
मिरवतोय निखार
टांगा लांब-लांब
आणि उंचापुरा
देह
नखापासून
शिखेवरी
लावण्य-आरोह


Coppersmith Barbet
मळवटांतलं
सांडलया
वाईच
थोडं कुक्कू
हातांत पदर
नी झांजा'
म्हनं,
'कशी म्या
झाकूं?'
अंगभर हिरवं नेसूं
नी पिंजर कपाळभर
खंडोबाची मुरळी जनूं
आलीया फांदीवर
पन बेचकींतून पांखरू
हेरतंय कुना ?
दिसतोया कां बांड कुठं
देखणा जीवघेणा ?


Mourning Wheatear
विणत्यांत घरटी
इवला जीव ! पन झेप घेता
आभाळभर होईल
सात समिंदर पार करून
दूर देशी जाईल


कडकलक्ष्मीचा अवतार
पाहुन
सांडलीन वेंधळ्यानं
पिंजर
नी लाल झाला ना
डगला !
दिठींत भोळाभाव ?
अं हं ! घेऊं
पाहातोय हा
दूरच्या भक्षाचा
ठाव...
Coppersmith Barbet

# रंगबहार


जलधारांनी न्हाली राने
झुळझुळती त्यांची मधुगाने
शिवार हिरवे सरसर शिरवे
वाटे भिजण्या पळत सुटावे
श्रावणमासी हर्षोल्हासी
सुखावले जन चहूंकडे
सणासुदीच्या पक्वान्नांचा
अबालवृद्धान मोह पडे


कुठून कसं कोण आलं ?
अद्भुत रंगांनी वावर सजलं
श्रावणसरींत न्हाऊन धराराणी
कंच हिरवी मिरवतिये पैठणी
पदराच्या शेवाला निळ्या भुऱ्या गाठी
अनिमिष ! निवता निवत नाहिये दिठी


सुखं सारी एकावेळी
अवतरली जळी स्थळी
पंचमहाभूतं विसरून भान
निमिषमात्र विसावली
नकां निरखूं पारखूं सारं
दृष्ट उगा लागेल ना !
साठवून जपून अंतरात, ओढा
जिण्याच्या रहाटगाडग्यांना..


बोभान ऊधळलाय प्रीतरंग
कोंडून काळजांत कली काळा
अशांच सतत देतांत संग
जिण्याच्या खेळांतल्या कळा
पिवळ्या लाल निळ्या ज्योती
देतांत फसव्या मायेची धग
काजळीचंच होतं घर
वातींतली जेंव्हा उतरते रग

थोडी

# फुले

माळून ये


शाखशिखांवर मोहर
की हिमनग मूक शुभ्र ?
असे भास क्षणोक्षणी
जागविती आठवणी
भूताच्या बासनांत
नवलपरी रोज नव्या
साठवुनी दिठिंत घेत
काळजांत रुजवाव्या





वसंत सरला तरिही सृष्टी
उपभोगे सुमनांची वृष्टी
रंगसोहळा करण्या स्वागत
मेघावळिचे गाजतवाजत

-अरुण काकतकर.






## ’ई’श्वर भक्तांची मांदियाळी- 3

### सुरेशचंद्र पाध्ये, माजी संपादक, दैनिक सकाळ

ज्याला संगीत-नाट्य-चित्र आणि कलांची आवड आहे, अशा व्यक्तीचं मन त्या त्या क्षेत्रातील सर्वोत्तमाचा ध्यास घेऊन त्याचा  शोध घेतच राहतं, पण त्याचबरोबर कलाक्षेत्रात नव्यानंच हातपाय मारू पाहणाऱ्यांनाही प्रथम पायवाट निर्माण करून देऊन मग महामार्गावर आणून  सोडायचे प्रयत्न करणं हेही काकतकरांचं वैशिष्ट्यच आहे आणि हे सारं करत असताना आपण स्वतःही कलानिर्मितीत आपल्या परीनंं सहभाग घेण्याची त्यांची हौस दांडगी आहे. या हौशीचाच आविष्कार रसिकांना तुडुंब आनंद देत साजरा करण्याचं व्यसन काकतकरांना आहे. असाच एक आविष्कार म्हणून चित्राक्षरीकडं पाहायला हवं. या चित्राक्षरीत प्रकाशचित्रं आहेत आणि या प्रकाशचित्रांचं कोंदण लाभावं, अशी अल्पाक्षरी कवितेची लेणी प्रदान केलेली आहेत. प्रारंभीच उषाताई मंगेशकरांचं एक चित्र आणि त्यावरची एक कविता येऊन भेटते. वाळवंटात उमटलेले पावलांचे ठसे आणि या ठश्यांदरम्यान एका विविक्षित  ठिकाणी वाऱ्यानंच झंकारत असलेला एक तंबोरा आपल्या डोळ्यांना दिसतो. सोबत उषाताईंबरोबरच त्यांचं प्रकाशचित्रही मागोमाग येतं आणि उषाताईंच्या त्या चित्रावरची अल्पाक्षरी बोलू लागते...

झंकार सोडूनी अपुरा गेली मीरा
इकतारा टाकूनि तसाच तिथे बिचारा
परि हरीची  होती असह्य कसनुशि ओढ
वेणूनादे उन्मळते अनादि वेड
पाऊलखुणा देतील आजही साक्ष
मधुराभक्तीचे विसरून जाणे लक्ष

पुढं ही कविता आणखीही बोलत जाते. अल्पाक्षरी असं तिला म्हणावं की नाही असा प्रश्न मनी डोकावतो; पण कवितेचा आशय़ शोधू जाता ती अल्पाक्षरीच आहे, हे  मान्य करावं लागतं. तशी हीच एक थोडी मोठी -म्हणजे पुस्तकातल्या अल्पाक्षरींच्या तुलनेत मोठी- कविता.


इवला एक मोदक,
त्याला एवढं मोठं पात्र ?
कसं पोटभर जेवेल
मुकेजला उमापुत्र ?
ना भाज्या, आमट्या, कोशिंबिरी
ना मूदीवर साजुक तूप,
पिवळ्याधम्मक वरणांवरंच
खरंतर खुलतं त्याचं रूप
चटण्यां, पापड, कुरडया,
भजी, कांहींच कसं नाही
ना मागमूस पंचामृताचा
आणि खिरीचाही
सुगरण रांधते आपांसाठी
थकेपर्यंत गात्र
नैवेद्याचं ताटं
आपल व्हावं निमित्त मात्र


हे थेंबच श्रावणसरिचे ,
कीं अश्रू शोकोद्भव ?
कीं तरुचे गळले पान,
घेई धरणीचा ठाव ?
वाळक्यांत पाउल पडता
कुरकुरती ठाई ठाई
मग उरे प्रतीक्षा केवळ
कधि मिळेल मृत्यूखाई
मातीत मिसळुनी जावे,
अन् मुळांसि धरुनि राहावे
धमन्यांत शोषिले जाउन
झाडांत पुन्हा उगवावे...

## 'ई'श्वर भक्तांची मांदियाळी- ४

सुरेशचंद्र पाध्ये, माजी संपादक, दैनिक सकाळ

बहुतेक साऱ्या प्रकाशचित्रांच्या चौकटीत मांडलेल्या अल्पाक्षरी कविता. मात्र प्रत्येकीचा आशय प्रकाशचित्राला शब्दसमृद्ध करणारा. लिखित साहित्याला सजवण्यासाठी आणि त्याची आशयस्पष्टता वाढवण्यासाठी रेखाचित्रं, प्रकाशचित्रं, आरेखनं आदींचा वापर प्रकाशन क्षेत्रात नेहमीच केला जातो. मधमाशा जशा फुलाफुलांतून मध गोळा करून पोळं समृद्ध करतात, तसाच काहीसा हा प्रकार असतो. इथं मात्र प्रकाशचित्रांना अधिक आशयसमृद्ध करण्यासाठी अल्पाक्षरी कवितांचा वापर केला आहे आणि म्हणूनच साहित्य-कला क्षेत्रातला हा नाविन्यपूर्ण उपक्रम आहे, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. काही उदाहरणं पाहू जाता, हे अधिक स्पष्ट व्हायला हरकत नाही. कदाचित आसावरी काकडे यांनी म्हटल्याप्रमाणं प्रकाशचित्र काही अधिकच्या बाबीही सोबत घेऊन येतं, पण ते कविमनासमोर साकारताना आणखी वेगळं तात्त्विक रूप घेऊनही उभं राहातं. आता हेच पाहा ना. करकोच्याचं प्रकाशचित्र खूप काही बोलत असतं, पण कवी म्हणतो,

उचलून पाय, हळूच एक
वेधेल भक्ष्य प्रवाही जळात.

हे वर्णन करून कवी पुढं म्हणतो...

साळसुदीचं पांघरून ढोंग,
भेदेल लक्ष्य पुढच्याच पळात...

बाकी सारं मनोहर दिसत असलं तरी साळसुदीचं ढोंग कवीला व्यक्त करणं गरजेचं वाटतं. कदाचित प्रकाशचित्रकाराला ते दृष्यात्मकतेपलिकडचं वास्तव जाणवलं असेलही - नसेलही, पण रसिकजनांना ते उलगडून दाखवण्याचं कसब कविचंच आहे, हे निश्चित आणि ते करताना प्रकाशचित्राची चौकट न भेदण्याचं कसबही सांभाळण्याकरता हा अल्पाक्षरीचा आधार.


Black Kite
झेपावतोय जळपृष्ठा समांतर
पण तीक्ष्ण नजर
पोहोचतेय खोलवर
विलक्षण
विजिगिषा
पसरल्या पंखांत
अपूर्व झोक
एकाग्र देहांत
चित्त दृश्यातला
जाणतय विखार
हिंसक ! तरी दिठीला
आनंद अपार


Koel Female
अंगभर ठिपके
घेऊनच
पांखरूं अवतरलय
रेखांनी जोडून
नक्षी
पूर्ण करायचं
तेवढं राह्यलय
तऱ्हा जेवढ्या
शोधाल
मधल्या सांधायला
जागा
वाव भरपूर सर्जनाला
आहे
चला ! कामाला लागा
सगळं कसं मिळेल ऐतं
बसल्या ठिकाणी,
सांगा ?
तपश्चर्येशिवाय होईल
वाल्याचा वाल्मिकी
उगा ?


इतकी अक्षरं लिवली
तरी संपना झाली शाई
जांभळ्या निळ्या रंगानं
भरून गेली राई
हिरवाई तोंड मधून
काढू पाहतेय वर..
'सांज पातूर' सांगा तीला
बाईच धिर धर'
सुकून भागून सारी
पडत्याल खाली..
रातभर कळ्यांची मग
संगत भाबडी भोळी..


हिरवाईच्या
पिसाऱ्याला,
इंद्रधनूची झालर
वर आभाळांत
जांभळ्या
मेघावळीचा वावर
धरेवर कलावतूं
सारख्या
कोसळतील धारा
आवरून रंगांचा
पसारा पसार
होइल वारा

## ’ई’श्वर भक्तांची मांदियाळी- ५

सुरेशचंद्र पाध्ये, माजी संपादक, दैनिक सकाळ

आणखी एक छान उदाहरण पाहू. हे प्रकाशचित्र पावसाची चाहूल लागत असताना परस्परसन्निध आलेल्या मोर आणि लांडोरीचं आहे. प्रकाशचित्रांतील त्या पक्ष्यांवरची नजरबंदी अफलातून आहे, शिवाय मोरपंखी पाखरांची उलघालही दाखवणारं आहे. आता कवी त्याचं वर्णन कसं करतो, ते पाहा. तो म्हणतो...

जुळून आलीत मनं,
पण देहांत मात्र अंतर आहे,
परिस्थितीचा डंख असा की,
मधून नुसतं वारं वाहे...

प्रकाशचित्रांतल्या दोन पक्ष्यांमधील अंतराचा वेध घेताना कविवर्यांना परिस्थितीचा डंख जाणवतो आणि प्रकाशचित्रांतून जाणवेल न जाणवेल, पण दोघांमधून अंतराचा पडदा पसरणाऱ्या वाऱ्यामुळं असलेलं अंतर त्याच्या अंतर्मनाला जाणवतं आहे. भारद्वाजाच्या सोनपंखात हरवून न जाता कवी म्हणतो, नावात ऋषिवर्य, पण वृत्तीनं, क्रूर नि लबाड... अगदी मोजक्या शब्दांत केलेलं हे वर्णन आपल्याला आपल्या आयुष्यात भेटलेल्या अशा अनेक भारद्वाजांची सय आणून दिल्याशिवाय राहणार नाही.
काळोखभरल्या आसमंतात मिणमिणत्या पणतीच्या प्रकाशचित्राकडे पाहून 'एका पणतीचा प्रकाश अंधार नष्ट करायला पुरेसा असतो', अशा घासून गुळगुळीत झालेल्या गोष्टीचा  आधार कवी फारसा घेत नाही. म्हणजे  ती वस्तुस्थिती तो टाळतही नाही, पण त्यापुढं जाऊन थोडक्या शब्दांत बरंच काही बोलतो.
अशा या चित्राक्षरीतील शब्दचित्रांद्वारे रसिकांना कलात्मक आनंद निश्चितच मिळेल, असं निश्चितपणे म्हणता येतं.

(चित्राक्षरी च्या पहिल्या भागावरचं पाध्ये सरांचं हे चिंतन आम्ही दुसऱ्या भागात घ्यायचं ठरवलं. हे चिंतन म्हणजे एखादं पुस्तक कसं वाचावं, चित्र कसं पहावं आणि कविता कशी जाणावी याचा वस्तुपाठच आहे - संपादक)

या पुस्तकातील लेखनाचे, चित्रांचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे, व छायाचित्रकारांकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २२ ऑगस्ट २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे पुस्तक इतर कोणत्याही वेबसाइटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त इतर कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.


अरूण काककतकर


आसावरी काकडे


मिलिंद सबनीस


राम केळकर

# हे देणे ज्यांचे

अल्पाक्षरी :
अरुण काकतकर
१२/०८, लक्ष्मीनारायण नगर,
पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे ४११००४
भ्रमणध्वनि: ९१५८८८९४८८ ९८२२०२१५२१
E mail:  24ak47@gmail .com

## छायाचित्रे :

डॉ. श्रीकांत केळकर,
नेत्रशल्यचिकित्सा तज्ज्ञ,

आसावरी काकडे
डी 1/3,स्टेट बँक नगर सोसायटी,कर्वेनगर,पुणे 411052
asavarikakade@gmail.com
Mob. No. 9762209028


डॉ. कौमुदी गोडबोले,
अनुवंश-शास्त्र तज्ज्ञ

मिलिंद सबनीस,
Ç-8, अथश्रि ,बावधन, pune-411021.
M - 9422318963
email - mish2812@gmail.com

डॉ. पौर्णिमा करंदीकर,
मेंदूविकार तज्ज्ञ..

चित्रकार व छायाचित्रकार
राम केळकर
C/O प्रांजल केळकर. 206 आर के spectra. डीएसके रानवारा रोड पाटील नगर
बावधन बुद्रुक पुणे ४११०२१.
Mob.no.8975234214 Email. rammrunal553@gmail.com

प्रकाशन: २२ ऑगस्ट २०२० (श्रीगणेशचतुर्थी)











CLICK

ON THE

COVER

OPEN


THE BOOK




तिन्हीसांजा

# सखे

मिळाल्या




लवकरच येत आहे

चित्राक्षरी - ३